# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


## परिपत्रक क्र.१६८

विषय :ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या जास्त दराच्या व कमी दराच्या निविदांच्या बाबतीतील ठेकेदाराने सादर करावयाच्या समर्थनाबाबत.

**पार्श्वभूमी :**

सद्य:स्थितीत ई-निविदा पध्दतीने निविदा प्रक्रिया चालू असून, त्यानुसार ठेकेदार निविदेच्या अंदाजित किंमतीवर जास्त किंवा कमी दराच्या टक्केवारीचा उल्लेख करुन निविदांचे सादरीकरण करतात. वित्तीय लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर सविस्तर निविदा प्रस्तावाच्या सादरीकरणावेळी ठेकेदारांकडून त्यांच्या देकाराबाबत समर्थन मागविण्यात येते. तदनंतर निविदेचे मुल्यांकन करणे, ठेकेदाराच्या समर्थनातील मुद्यांवर अभिप्राय देणे, सविस्तर निविदा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करणे यामध्ये कालापव्यय होतो.

त्याचप्रमाणे ठेकेदाराने दिलेला जास्त किंवा कमी दराचा देकार निविदेतील कोणत्या उपांगांमधील कोणकोणत्या बाबींचा निविदा दर विचारात घेऊन भरलेला आहे, याचाही बोध होणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**मार्गदर्शक सूचना :**

- यापुढे ठेकेदाराने ई-निविदा प्रक्रियेव्दारे देकार सादर करतानाच निविदेच्या अंदाजित किंमतीपेक्षा जास्त किंवा कमी दरांच्या देकारांबाबत त्यांचे समर्थन आवश्यक कागदपत्रांसह संबंधीत निविदा संकेत स्थळामध्ये सादर करावेत.
- मजीप्राच्या संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी यासाठी आवश्यक ती अट /टिप्पणी निविदेमध्ये अंतर्भूत करावी. तसेच इ-निविदा संकेतस्थळावर निरविदा प्रसिध्द करताना, इ-निविदेशी संबंधित आय.टी. विभागाच्या अधिकारी/सल्लागार यांना आर्थिक बिडमध्ये

सदर समर्थन सादर करणेची सुविधा उपलब्ध करणेबाबत कळविणे गरजेचे राहील. तसेच निविदा अपलोड करताना सदर सुविधा उपलब्ध केल्याची खातरजमा करावी.

- देकाराचे समर्थन सादर करताना निविदेतील महत्वाच्या बाबी म्हणजेच, आरसीसी, स्टील रिन्फोर्समेंट, पाईपलाईनची खोदाई, पाईप्स पुरवठा, वाळू, सिमेंट इ. बांधकाम साहित्याचा दर, मजूरीचा दर, तसेच आणखी काही महत्वाची बाब ज्यामुळे जास्त/कमी देकार भरण्याची परिस्थिती उद्भवली असल्यास त्या सर्व बाबतीत निविदेतील दर व देकार भरताना विचारात घेतलेला दर, त्यामुळे वाढणारी/कमी होणारी रक्कम यांचे विवरण, कारणमिमांसा इ. याबाबतचा उहापोह ठेकेदाराने करणे आवश्यक आहे.

- याबाबत सविस्तर सूचना निविदेतील स्पेसिफिकेशन्समध्ये खालीलप्रमाणे उल्लेख करण्यात यावा.

  "If bidder's offer is above or below the estimated cost, the reasons supporting the above or below offer along with necessary documents should also be uploaded during the submission of tender in Envelope No.2 (Financial Bid)."

- ठेकेदाराचा देकार, देकाराच्या अनुषंगाने ठेकेदारांनी सादर केलेले समर्थन, त्यावर मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाचा प्रत्येक मुद्यावर अभिप्राय, देकाराबाबत योग्य कारणासह शिफारस इ. तपशीलासह निविदा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करावेत.

सदर परिपत्रकातील तरतूद या परिपत्रकाच्या दिनांकापासून प्रसिध्द करण्यात येणाऱ्या निविदा सूचनांकरिता अंमलात येतील.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ १०११
दि.१४ सप्टेंबर, २०१५

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई-२१ रवाना 21 SEP 2015

- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गुणवत्ता परिक्षण पथक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
  ***सदर परिपत्रक मजीप्राच्या संकेत स्थळावर अपलोड करावे.***
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/ औरंगाबाद/लातूर/नांदेड/नाशिक/अहमदनगर/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वि., ठाणे/ अंबरनाथ (जव्य)/ विरार (जव्य)/ पनवेल (जव्य)/ अलिबाग/ रत्नागिरी/ओरस कणकवली/ पुणे-१ / पुणे-२/ कराड/ सातारा (जव्य)/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ औरंगाबाद / बीड/ जालना / लातूर/ उस्मानाबाद/ नांदेड/ परभणी/ जळगाव/ नाशिक/ नाशिक (जव्य)/ अहमदनगर/ संगमनेर/ अमरावती/ अमरावती (जव्य)/ यवतमाळ/ अकोला/ वाशिम / बुलढाणा/ नागपूर/ नागपूर (जव्य)/ गोंदिया/ चंद्रपूर/ वर्धा.